# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 05/03/2020 (गुरूवार)
# (सकाळ)

---

## जबरी चोरी

1) पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत 500 मी अंतरावर वार्ड क्र. 2 खापरखेडा पालीवार सरकार मान्य देशी दुकान येथे दिनांक 24/12/2018 चे 13.00 वा. ते 14.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– राकेश सोमेश्वर ढेबुदास, वय 28 वर्ष, रा. ईतवारी पेठ उमरेड हा मोटरसायकलवर त्याचा मित्र नामे– तुषार खोब्रागडे, रा. कावरापेठ तांडा यास डबलसिट बसवुन बायपास वरून त्याचा घरी सोडण्यास जात होता. दरम्यान अमराई जवळ आरोपी क्र. 1) अब्दुल हबीब शेख, वय 40 वर्ष, रा. कावरापेठ झोपडपटटी, अमराई उमरेड व 2) अज्ञात आरोपी हे लाल रंगाचे मोटरसायकलवर येवुन फिर्यादीचे मोटरसायकला थांबविली. यानंतर फिर्यादी व त्याचा मित्राला आरोपी क्र. 1) याने चाकुचा धाक दाखवुन "तुम्हारे पास जेब मे जो कुछ है बाहर निकालो" असे म्हणुन आरोपी क्र. 2) याने फिर्यादीचे पॅन्टचे खिश्यातील त्याचा एम.आय नोट 5 कि. 5,000/–रू. चा व नगदी 2,000/–रू. तसेच तुषार खेब्रागडे याच्या पॅन्ट मधुन त्याचा सॅमसंग जे 6 मोबाईल कि. 7,000/–रू. व नगदी 600/–रू. असे दोन मोबाईल व नगदी पैसे असा एकुण कि. 14,600/–रू. चा मुद्देमाल हिसकावुन तुषार खोब्रागडे ला हातबुक्कीने मारहाण करून पळुन गेले

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीतांविरुध्द कलम 392, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपी क्र. 1 ला अटक करण्यात आली असून सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक पाटील 9049989341 हे करीत आहे.

2) पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत 13 कि. मी अंतरावर मौजा कवडस शिवार येथे दिनांक 04/03/2020 चे 11.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– विशाल अशोकराव निकोसे, वय 38 वर्ष, रा. माळेगाव, ता. सावनेर हे खापरखेडा येथुन किराणा मालाचे पैसे पॅन्टचा एका खिशात 30,000/– रु. व दुसऱ्या खिशात 50,043/– रु. घेवुन अल्फा मालवाहक ऑटोने सावनेर येथे जात होते. दरम्यान फिर्यादी हे लघुशंके करीता थांबले असता अज्ञात 3 आरोपीतांनी संगनमत करुन मोटरसायकल वर ट्रिपल सीट आले. त्यातील एकाने फिर्यादीचे डोळयात मिरची पावडर फेकुन दुसऱ्याने जबरीने खिशातुन 30,000/–रू. करून पळुन गेले

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीतांविरुध्द कलम 394, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक सागर कारंडे 7722011228 हे करीत आहे.

# चोरी

पो.स्टे. पारशिवनी :– अंतर्गत 18 किमी अंतरावर मौजा सत्रापुर शिवार येथे दिनांक 03/03/2020 चे 18.00 वा. ते दिनांक 04/03/2020 चे 10.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– बादल अनिल पांडे, वय 25 वर्ष, रा.प्लाट नंबर 316 सी भारत नगर कळमना मार्केट, नागपुर हे नेहमी प्रमाने सत्रापुर शिवारातील त्यांच्या फार्म हाउस मध्ये रेस्टॉरेंटचे बांधकाम पाहण्याकरिता गेले होते. दरम्यान फिर्यादीला त्यांचे रेस्टारेन्टचे स्वयंपाक खोलीचे आत जाण्याकरिता दोन दरवाजाला लावलेली सागवनी फ्रेंम व हॉलची एक जमिनीवर ठेवलेली 03 नग सागवनी दरवाजाची फ्रेम असा एकुण किमती 22,500/– रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक मनिराम नेवारे हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर